# येशू आमचा खरा मित्र आहे

घरोघर भेटी देण्याविषयी मुलांना शिकवा.

शिकविण्यासाठी पुढीलपैकी कोणतेही कार्यक्रम निवडा.

मोठ्या मुलाने किंवा शिक्षकाने: येशू आणि त्याचा मित्र लाजर यांचा कथा वृत्तांत वाचावा किंवा सांगावा (**योहान 11:1-44**). यामध्ये येशू लोकांच्या घरी जाऊन कशी भेट देत असे ते सांगितले आहे. त्याचे आपल्या मित्रांवर प्रेम होते आणि त्याने त्यांना नवे जीवन दिले.

चित्र काढा. मुलांनी पुढील चित्र काढावे किंवा रंगवावे.



कथा वृत्तांत सांगून झाल्यावर प्रश्न विचारा. आवश्यकता असेल तर प्रत्येक प्रश्नाच्या पुढे उत्तरे दिली आहेत.

1) येशू आपल्या आजारी मित्राला दोन दिवस उशीराने भेटण्यास का गेला? *(पाहा वचन 4)*

2) लाजर मरण पावलेला असतानाही ती झोपला असल्याचे येशूने का म्हटले? *(कारण लाजर मृतावस्थेत फार काळ राहणार नव्हता. पाहा वचन 4)*

3) कबर पाहिल्यावर येशूने काय केले? *(पाहा वचन 35)*

4) येशूमधील विश्वासणाऱ्यांचे मृत्यूनंतर काय होते? *(पाहा वचन 25)*

5) कबरेतून लाजर बाहेर आला तेव्हा त्याने कोणते कपडे घातले होते? *(पाहा वचन 44)*

कथा वृत्तांताचे नाट्यीकरण करा. मुलांना हो छोटीशी नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करून व्यवस्था करा.

- मुलांकडून तयारी करून घेण्यासाठी वेळ द्या.
- तुम्ही सर्वच भूमिका केल्या पाहिजेत असे नाही.
- मोठ्या मुलांनी लहान मुलांना मदत करावी.

मोठ्या मुलांनी किंवा प्रौढांनी पुढील भूमिका कराव्यात

**निवेदक** कथा वृत्तांताचा सारांश तयार करून मुलांकडून संवाद पाठ करून घ्या.

**येशू**

**मरीया**

**मार्था** लाजराला गुंडाळण्यासाठी कापडाचे तुकडे जमवा आणि कबर म्हणून एक टेबल ठेवा. लहान मुलांनी पुढील भूमिका कराव्यात:

**शिष्य**

**थोमा**

**दूत**

**लाजर**

**कबरेजवळ जमलेले लोक**

**भाग एक**

**निवेदक :** योहान 11:1-16 मधून कथा वृत्तांताचा पहिला भाग सांगून म्हणा, ''लाजर काय म्हणतो ते ऐका.''

**लाजर:** ''मला फार अस्वस्थ वाटते. बहुतेक आता मी मरणार.''

**मार्था:** दूताला म्हणते,''दादा, पट्कन जाऊन येशूला निरोप सांगा येऊन तुमच्या मित्राला बरे करा.''

**दूत:** येशूकडे धावत जाऊन म्हणा,''येशू, लवकर चला! तुमचा मित्र लाजर मरणाच्या दारात आहे''.

**येशू:** ''तो मरणार नाही. मी काही दिवस थांबून मग गेले पाहिजे म्हणजे देवाचे गौरव होईल''(बसून राहा).

**निवेदक:** ''काही दिवस उलटले.''

**येशू:** उठून उभे राहून म्हणतो, ''आता गेले पाहिजे, वेळ झाली आहे.''

**शिष्य:** ''येशू, तुम्ही लाजाराच्या घरी जाऊ नका!'' ''यहूदी लोक तुम्हांला मारायला टपले आहेत!''

**येशू:** लाजर झोपला आहे. आपण जाऊन त्याला जागे करू या.'' लाजराच्या दिशेने चालायला लागला.

**थोमा:** ''मग आपणही येशू बरोबर मरावयास जाऊ.''

**भाग दोन**

**निवेदक:** योहान 11:17-28 मधून कथा वृत्तांताचा दुसरा भाग सांगून म्हणा, ''लाजरची बाहीण मार्था, काय म्हणते ते ऐका.''

**मार्था:** रडत रडत लाजराला कपड्यात गुंडाळा. मग त्याला टेबलाखाली जमीनीवर झोपवा. मग येशूकडे लक्ष गेल्याचे दाखवा. त्याच्याकडे जाऊन म्हणा,''प्रभुजी चार दिवसांपूर्वी लाजर मेला. आपण येथे असता तर तो मेला नसता.''

**येशू:** ''तुझा भाऊ पुन्हा जिंवत होईल. पुनरूत्थान व जीवन मीच आहे हे तुला ठाऊक नाही का?''

**मार्था:** ''ते मला ठाऊक आहे.''

**निवेदक:** योहान 11:29-44 मधून कथा वृत्तांताचा तिसरा भाग सांगून म्हणा, ''येशू काय म्हणतो ते ऐका''

**येशू:** ''मरीया कोठे आहे?''

**मरीया:** धावत येऊन म्हणा, ''येशू, तुम्ही माझ्या भावाला का मरू दिले?''

**येशू:** ''मला फार वाईट वाटते. त्याला कोठे ठेवले ते दाखव.''

**मरीया:** लाजराला कोठे ठेवले ते येशूला दाखवा.

**येशू:** जमीनीवर झोपविलेल्या लाजराकडे पाहून रडा आणि डोळे पुसा.

**कबरेजवळ जमलेले लोक:** ''पाहा, येशूचे त्याच्यावर किती प्रेम होते.'' ''हो, हो, तो अनेकदा आपल्या ह्या मित्राच्या घरी येत असे.''

**येशू:** मोठ्याने ओरडला, ''लाजरा, बाहेर ये!''

**लाजर:** अंगाला कपडे गुंडाळलेल्या अवस्थेत उठला.

**येशू:** त्याच्या अंगावरील प्रेतवस्त्रे काढून त्याला मोकळे करा.''

**कबरेजवळ जमलेले लोक:** लाजरच्या अंगावरील गुंडाळलेली कापडे काढा. आणि म्हणा, ''पाहा, पाहा, त्याने मेलेल्या माणसाला जिवंत केले!'' ''हा येशू आहे तरी कोण?''

**निवेदक किंवा मोठे मूल :** नाटिका संपल्याचे सांगून मदत करणाऱ्यांचे आभार माना.

**नंतर**

प्रश्न विचारा. मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसाठी सादर केले असेल तर वर दिलेले प्रश्न त्यांना मोठ्या माणसांना विचारण्यास सांगा.

चर्चा करा: ''लोकांना त्यांच्या घरी जाऊन भेटणे याशिवाय त्यांची सेवा आणखी कोणत्या प्रकारे करता येईल याची उदाहरणे सांगा?" (प्रौढांनी किंवा मुलांनी उत्तरे द्यावीत.)



चित्र काढा. एका टेबलावर खाद्यपदार्थ मांडून ठेवल्याचे चित्र काढून मुलांना ते उतरवून घ्यायला सांगा.

- मोठ्या मुलांनी लहान मुलांना मदत करावी.
- मुलांनी काढलेले चित्र त्यांनी उपासनेच्या वेळी प्रौढांना किंवा घरी आई-वडिलांना दाखवावे.
- टेबलावर खाद्यपदार्थ मांडून ठेवलेले चित्र, येशूचा आत्मा आमच्या घरी येऊन आम्हांला नवे जीवन कसे देतो, हे दाखविते, याचे स्पष्टीकरण करा. येशूबद्दल सांगण्यासाठी आम्ही लोकांच्या घरी जातो.
- आपल्या अंत:करणांच्या दाराशी उभ्या असलेल्या येशूविषयी पुढील पाठांतराच्या वचनातून स्पष्टीकरण करा.

पाठ करा प्रकटी 3:20

कविता. स्तोत्र 145:15,16 व 18 ही वचने तीन मुलांना प्रत्येकी एक असे म्हणायला सांगा.

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू तुझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या लोकांसाठी तू अद्‌भुत गोष्टी करतोस. तू आमच्या बरोबर राहतोस आणि आम्हांला नवे जीवन देतोस. तू आम्हांला मरणातून उठवून सदासर्वकाळ तुझ्याबरोबर जिवंत राहण्यास नेणार आहेस. इतरांची सेवा करून त्यांची भेट घऊन आमची कृतज्ञता दाखविण्यास साहाय्य कर''

Copyright 2003 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net